## प्रेस नोट

दिनांक 07.11.2022 ते 11.11.2022 या दरम्यान मा.खासदार श्री राहुल गांधी यांची **"भारत जोडो पदयात्रा"** नांदेड जिल्हयातुन जाणार आहे. सदर भारत जोडो पदयात्रेत 10000-15000 जनसमुदाय उपस्थितीत राहण्याची शक्यता आहे. सदर भारत जोडो पदयात्रा ही तेलंगाना राज्यातुन देगलुर येथे महाराष्ट्रात प्रवेश करणार आहे. पुढे नर्सी-नायगांव-मारताळा-कहाळा- चंदासिंग कार्नर- देगलुर नाका- रेल्वे स्टेशन- शिवाजी महाराज पुतळा- वजीराबाद चौक- ITI चौक शिवाजीगनर- नवा मोंढा येथील जाहीर सभेनंतर -ITI चौक- राज कार्नर- शिवमंदीर-रेल्वे डिव्हीजन- हातोडा चौक- सांगवी आसना नदी- अर्धापुर ते पुढे हिंगोली जिल्हयात प्रवेश करणार आहेत. सदर भारत जोडो पदयात्रे दरम्यान मा.खा. श्री राहुल गांधी यांचा नांदेड जिल्हयात 04 ठिकाणी मुक्काम असणार आहे.

या संदर्भात दिनांक 28.10.2022 रोजी ST विभागाचे अधिकारी, RTO अधिकारी, महामार्ग पोलीस अधिकारी, ट्रान्सपोर्ट अशोसिएशनचे पदाधिकारी यांचेशी चर्चा करुन भारत जोडो पदयात्रे दरम्यान नांदेड जिल्हयातील तसेच बाहेर राज्यातील प्रवाशी व मालवाहतुक करणाऱ्या वाहनांची गैरसोय होवु नये तसेच मा.खा.श्री राहुल गांधी यांना प्रदान असलेली सुरक्षा लक्षात घेता सदर कालावधीत शांतता व सुव्यवस्था राखणेकामी **मी श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, नांदेड** मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 36 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये वरील कलमान्वये खालीलप्रमाणे वाहतूकीच्या नियमना संबंधाने अधिसूचना काढत आहे.

दिनांक 07.11.2022 ते 11.11.2022 या दरम्यान मा.खासदार श्री राहुल गांधी यांची **"भारत जोडो पदयात्रा"** नांदेड जिल्हयातुन जाणार असून मुख्य रस्त्यावर भारत जोडो पदयात्रा व वाहनांच्या वाहतूक व्यवस्थेत तात्पुरत्या स्वरुपात खालील पर्यायी मार्गावरील वाहतूकीस वळण देऊन बदल करण्यात येत आहे.

रुग्णवाहीका व अत्यावश्यक सेवेतील वाहने तसेच या कार्यालयाने परवानगी दिलेल्या वाहनाला याअधिसुचनेतुन मोकळीक देण्यात येत आहे.

**भारत जोडो पदयात्रा अनुषंगाने वाहतुकीचे नियोजन**

| अ. क्र. | दिनांक | वेळ | वाहतुकी करीता बंद असलेले मार्ग | वाहतुकी करीता पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|---|
| 1 | 07.11.2022 | 14.00 ते 23.00 वा. पावेतो | ➢ नर्सी चौक ते देगलुर राष्ट्रीय महामार्ग क्र. 161 सर्व प्रकारचे वाहतुकीसाठी जाणे-येण्यासाठी पुर्णपणे बंद राहील. | ➢ नर्सी- गडगा- खरब खंडगांव- भायेगाव मार्ग देगलुर येण्या-जाण्यासाठी वाहतुक चालु राहील.<br>➢ जड वाहनासह इतर वाहनांकरीता नर्सी- गडगा- मुखेड- बाऱ्हाळी- मुक्रमाबाद- करडखेड- देगलुर येण्या-जाण्यासाठी वाहतुक चालु राहील.<br>➢ नर्सी- कासराळी- रुद्रापुर- मुतन्याळ- थडीसावळी- खतगांव- कोटेकल्लुर- शहापुर- सुंडगी- हनुमान हिप्परगा- देगलुर. तसेच देगलुरकडुन याच मार्गाने येण्या-जाण्यासाठी वाहतुक चालु राहील. |